महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब पदावरुन जिल्हा तांत्रिक सेवा गट-क (कृषि) पदावर पदावनत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः आकृवि २४१८/प्र.क्र.२५८(१)/१५ अे
मंत्रालय विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई - ३२.
तारीख: २० जून, २०१९

वाचा:-

१) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र.आकृवि १२१३/प्र.क्र.१३०/१५ अे, दि. ०५.०९.२०१४
२) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र. बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२A/१६-ब, दि. २९.१२.२०१७
३) मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचा दि.२४.०२.२०१८ रोजीचा न्यायनिर्णय
४) आयुक्त (कृषि) यांचे पत्र क्र.एवायझेड-२०१५/वर्ग-२/पदोन्नती-जि.प./प्र.क्र.५३/ आस्था-१/४६९, दि.२९ मार्च, २०१९

प्रस्तावना :-

संदर्भ क्र.१ येथील दि.०५/०९/२०१४ रोजीच्या आदेशान्वये श्री.एम.यु.पाटकर (विमाप्र) यांना जिल्हा परिषदेतील जिल्हा तांत्रिक सेवा गट-क (कृषि) संवर्गातून महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब संवर्गात विमाप्र प्रवर्गातून तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आली होती. तदनंतर श्री. एस.डी. शिरसाठ (विमाप्र), जिल्हा तांत्रिक सेवा गट-क (कृषि), पंचायत समिती पैठण, जि. औरंगाबाद यांनी ते श्री.एम.यु.पाटकर यांना ज्येष्ठतम असूनही त्यांना महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब पदावर विमाप्र प्रवर्गातून पदोन्नती मिळाली नसल्याने त्यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे त्यांनी रिट पिटीशन क्र. ४८३०/२०१६ दाखल केली. मा. उच्च न्यायालयाने संदर्भ क्र.३ येथील आदेशान्वये दि. २४.०२.२०१८ रोजी सदर प्रकरणी न्यायनिर्णय पारित करतांना त्यामध्ये असे नमूद केले आहे की, श्री. शिरसाठ यांना म.कृ.से., वर्ग-२ पदावर विमाप्र प्रवर्गातून दि.०५.०९.२०१४ पासून पदोन्नती देण्यात यावी. तथापि, श्री.पाटकर यांच्याकरिता विमाप्र प्रवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्याने तसेच सेवाज्येष्ठतेनुसार ते पदोन्नतीस पात्र नसल्याने त्यांना जिल्हा तांत्रिक सेवा, वर्ग-३ (कृषि) या पदावर पदावनत करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय :-

श्री. एम. यु. पाटकर, महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब यांना जिल्हा तांत्रिक सेवा, वर्ग-३ (कृषि) या पदावर पदावनत करून तसेच त्यांची महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब संवर्गातील पदोन्नती अभावित ठरवून त्यांना पुढीलप्रमाणे निम्न पदावर पदावनत करण्यात येत असून त्यांची पदस्थापना कृषि अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला या पदावर करण्यात येत आहे.

२. श्री. एम. यु. पाटकर यांचा ग्रामविकास विभागाच्या दि.०१.१.२०१४ रोजीच्या अंतिम ज्येष्ठता सूचितील ज्येष्ठता क्रमांक कायम राहिल.

३. श्री.पाटकर यांना जरी निम्न पदावर पदावनत करण्यात येत असले तरी त्यांनी महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब पदावर प्रत्यक्ष काम केले असल्यामुळे त्या पदावरील वेतनासंदर्भात त्यांच्याकडून वसूली करण्यात येऊ नये.

४. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरचे आदेश तात्काळ अंमलात येतील हे कृपया पहावे.

५. सदरचे आदेश सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१२ च्या अनौपचारिक संदर्भ क्र.४४/का.१२, दि.१०/०१/२०१९ आणि कार्यासन साप्रवि/१६-ब च्या अनौपचारिक संदर्भ क्र.३२५ ए/१६ ब, दि.२६/११/२०१८ अन्वये तसेच वित्त विभाग, सेवा-३ च्या अनौपचारिक संदर्भ क्र. अनौ/सं.क्र.६६/१९/सेवा-३, दि.०७.०२.२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२०१५००५९८१०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Amol Nilakanth Sakharkar

Digitally signed by Amol Nilakanth Sakharkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture Animal Husbandry dairy and Fisheries Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=36b60751d094e56d974e1a44ec234c475fb0de5b35a79c1cf69a588f212b260e, serialNumber=bb4888cebbf4b7a6440c6531a52925e3c8140b1c28df723d8f006d11bc169a08, cn=Amol Nilakanth Sakharkar
Date: 2019.06.20 17:05:07 +05'30'

(अ.नि.साखरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा) ½, महाराष्ट्र मुंबई / नागपूर.
५. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला/औरंगाबाद
८. उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. उप सचिव (१२) व (१६ब), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. उप सचिव (सेवा-३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११. कृषि सह संचालक, (आस्थापना), कृषि आयुक्तालय, पुणे
१२. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
१३. सर्व संबंधित अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
१४. निवड नस्ती /१५अे.